लोकमत

# एम.फिल., पीएच.डी. प्रवेश परीक्षा सुरु

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांच्या एम.फिल. आणि पीएच.डी. अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी यावर्षी एकूण ११८२ जागा उपलब्ध आहेत. त्यासाठी विद्यापीठाच्या प्रवेश परीक्षांचा बुधवारपासून प्रारंभ झाला. पहिल्या दिवशी १६०४ जणांनी परीक्षा दिली.

यावर्षी एम.फिल.च्या विविध २६ अभ्यासक्रमांसाठी २८३, तर पीएच.डी.च्या विविध ४६ अभ्यासक्रमांसाठी ८९९ जागा उपलब्ध आहेत. शिवाजी विद्यापीठातील मानव्यशास्त्र सभागृह, सांगलीतील श्रीमती मथुबाई गरवारे महाविद्यालय, साताऱ्यातील यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स या केंद्रांवर सकाळी दहा ते दुपारी बारा, दुपारी एक ते तीन आणि दुपारी चार ते सायंकाळी सहा या वेळेत परीक्षा झाली. पहिल्या दिवशी व्यवसाय व्यवस्थापन, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग, मराठी, संख्याशास्त्र, रशियन, समाजशास्त्र, बिझनेस इकॉनॉमिक्स, अकौटंन्सी, कॉमर्स, भौतिकशास्त्र, फूड टेक्नॉलॉजी इंजिनिअरिंग, बायोटेक्नॉलॉजी इंजिनिअरिंग, हिंदी, टेक्सटाईल इंजिनिअरिंग, आदी अभ्यासक्रमासाठी एकूण १६०४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. ५३७ परीक्षार्थी गैरहजर राहिले. विविध २० अभ्यासक्रमांसाठी शुक्रवारी (दि. १०) परीक्षा होणार आहे.

Kolhapur Main
Page No. 4 Aug 09, 2018
Powered by: erelego.com

लोकमत

# वायुप्रदूषण मूल्यमापन प्रणाली हवी

## तज्ज्ञांचे मत : शिवाजी विद्यापीठातील कार्यशाळा उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** वायुप्रदूषण हा सध्या अत्यंत कळीचा मुद्दा बनला आहे. वाढते औद्योगिकीकरण, वाहतूक आणि इतर कारणांमुळे होणारे इंधनाचे ज्वलन हे वायुप्रदूषण वाढविणारे महत्त्वाचे घटक आहेत. यामुळे होणाऱ्या वायुप्रदूषकांच्या उत्सर्जनाची माहिती सामान्य नागरिकाला व्हावी, या दृष्टीने 'स्टार रेटिंग प्रोग्राम' ही वायुप्रदूषण मूल्यमापन प्रणाली उपयोगात आणली आहे. ती सर्वसामान्यांना माहितीच्या दृष्टीने उपयुक्त, आवश्यक आहे, असा सूर शिवाजी विद्यापीठातील कार्यशाळेत बुधवारी उमटला.




**कोल्हापुरात बुधवारी शिवाजी विद्यापीठातील कार्यशाळेत ईशान चौधरी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डावीकडून सागर डेळेकर, प्रशांत गायकवाड, उदय गायकवाड, पी. डी. राऊत उपस्थित होते.**

### प्रदूषण कमी करण्याचे उपाय

कोल्हापूरमध्ये शिवाजी विद्यापीठ, दाभोळकर कॉर्नर, महाद्वार रोड या तीन ठिकाणी हवेचे मापन केले जाते. काही ठिकाणी हवेची गुणवत्ता ढासळत असल्याचे दिसत आहे. असे प्रदूषण कमी करण्यासाठी शहराच्या काही भागांत हरितऊर्जेचा वापर, शहरात 'नो व्हेईकल', 'नो वे', 'नो पार्किंग झोन' करणे तसेच इंधनातील भेसळ थांबविणे, फटाके उडविण्यास बंदी करणे असे उपाय आवश्यक आहेत, असे पर्यावरणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत यांनी सांगितले.

या प्रणालीची माहिती करून देण्यासाठी शिवाजी विद्यापीठाचा पर्यावरणशास्त्र विभाग, विद्यापीठ व उद्योग संवाद केंद्र, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि शिकागो विद्यापीठाची एनर्जी पॉलिसी संस्थेतर्फे कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्यात ईशान चौधरी म्हणाले, या प्रकल्पाशी महाराष्ट्रातील २६० उद्योग जोडलेले आहेत. या उद्योगांतून बाहेर पडणाऱ्या कणस्वरूपातील प्रदूषकांची माहिती mpcb.info या संकेतस्थळावर दिसणार आहे. जो उद्योग अधिक प्रदूषण करतो त्याला एक स्टार आणि जो त्याहून कमी प्रदूषण करतो, त्याला त्या प्रमाणात पाचपर्यंत स्टार या पद्धतीने कणस्वरुपातील प्रदूषकांच्या प्रमाणावर रेटिंग ठरणार आहे. ज्या उद्योगातून प्रदूषण होत असल्याची तक्रार येईल, त्याच्याशी थेट संवाद साधण्यासाठी या उपक्रमाचा व्यासपीठ म्हणून उपयोग होऊ शकेल. पर्यावरणतज्ज्ञ उदय गायकवाड म्हणाले, कोल्हापूर शहरातील वायुप्रदूषणाचा विचार करताना रेल्वे, बस आणि इंधनातील भेसळीमुळे होणाऱ्या प्रदूषणाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कोल्हापूर विभागाचे उपप्रादेशिक अधिकारी प्रशांत गायकवाड म्हणाले, उद्योग आणि प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यामधील माहितीची दरी या उपक्रमामधून दूर करता येणे शक्य आहे. या कार्यक्रमास डॉ. आसावरी जाधव, नीलिशा देसाई, पल्लवी भोसले, सोनल चोंदे, आदी उपस्थित होते. डॉ. सागर डेळेकर यांनी आभार मानले.

पुढारी

# वायू प्रदूषणाची माहिती समजून घ्यावी : चौधरी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

वायू प्रदूषण हा सध्या अत्यंत कळीचा मुद्दा बनला आहे. वाढते औद्योगिकीकरण, वाहतूक आणि इतर कारणांमुळे होणारे इंधनाचे ज्वलन हे वायू प्रदूषण वाढवीत आहे. वायू प्रदूषकांच्या उत्सर्जनाची माहिती सामान्य नागरिकाला व्हावी, यासाठी 'स्टार रेटिंग प्रोग्राम' ही वायू प्रदूषण मूल्यमापन प्रणाली उपयोगात आणली आहे. ही प्रणाली सर्वसामान्यांना माहितीच्या दृष्टीने उपयुक्त आणि आवश्यक असल्याचे मत अभ्यासक इशान चौधरी यांनी बुधवारी शिवाजी विद्यापीठात आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेत व्यक्त केले.

'स्टार रेटिंग प्रणाली'ची माहिती करून देण्याच्या उद्दिष्टाने शिवाजी विद्यापीठाचा पर्यावरणशास्त्र विभाग, उद्योग संवाद केंद्र, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि शिकागो विद्यापीठाची एनर्जी पॉलिसी संस्था यांच्या वतीने कार्यशाळा झाली. यावेळी ते बोलत होते.




**कोल्हापूर : कार्यशाळेत बोलताना ईशान चौधरी. व्यासपीठावर डावीकडून डॉ. सागर डेळेकर, प्रशांत गायकवाड, उदय गायकवाड, डॉ. पी. डी. राऊत आदी मान्यवर.**

चौधरी म्हणाले, उद्योगांमधून किती वायू प्रदूषण होते, ते सर्वसामान्यांना सहज-सोप्या पद्धतीने कळावे, हा या प्रकल्पाचा प्रमुख उद्देश आहे. या प्रकल्पाचा मूळ उद्देश लोकसहभागचा आहे. महाराष्ट्रातील २६० उद्योग या प्रणालीशी जोडलेले आहेत. या उद्योगांतून बाहेर पडणाऱ्या कण स्वरूपातील प्रदूषकांची माहिती वेबसाईटवर दिसणार आहे. डॉ. पी. डी. राऊत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कोल्हापूर विभागाचे उपप्रादेशिक अधिकारी प्रशांत गायकवाड, पर्यावरण अभ्यासक उदय गायकवाड आदींनी यावेळी विविध विषयांवर सविस्तर माहिती दिली. समन्वयक डॉ. सागर डेळेकर, डॉ. आसावरी जाधव, डॉ. नीलिशा देसाई, डॉ. पल्लवी भोसले, डॉ. सोनल चोंदे यांच्यासह महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे विविध उद्योगांचे प्रतिनिधी, संशोधक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढारी

# ‘वित्तीय क्षेत्रातील वर्तमान अस्वस्थता’ विषयावर शनिवारी व्याख्यान

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या दि युनायटेड वेस्टर्न बँकेचे कै. आर. एन. गोडबोले अध्यासन व देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्सच्या वतीने शनिवारी (दि. ११) सकाळी ९.३० वाजता विशेष व्याख्यानाचे आयोजन केले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. अनिल वावरे हे ‘वित्तीय क्षेत्रातील वर्तमान अस्वस्थता’या विषयावर व्याख्यान देणार आहेत. प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन हे अध्यक्षस्थानी असतील. प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील प्रमुख उपस्थितीत असणार आहेत. देशाच्या वित्तीय क्षेत्रातील वर्तमान परिस्थितीचे आकलन योग्य पद्धतीने होण्यासाठी असे व्याख्यान महत्त्वपूर्ण असून सर्वांनी या व्याख्यानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या दि युनायटेड वेस्टर्न बँकेचे कै. आर. एन. गोडबोले अध्यासन व देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स यांच्या वतीने कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी केले आहे.